# मिरा भाईंदर महानगरपालिका

डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन (नगर भवन), मांडली तलाव,
दुसरा मजला, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे -401 101.
Email:- education@mbmc.gov.in

## शिक्षण विभाग

जा.क्र.मनपा/शिक्षण/ 480/2026-27 दि. 14 / 07/2026

प्रति,
जनसंपर्क अधिकारी
जनसंपर्क विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विषय :- जाहिर आवाहन वर्तमानपत्रात प्रसिद्ध करणेबाबत.**
**संदर्भ :- मा. आयुक्त सो. यांचेकडील दि. १३/०७/२०२६ रोजीची मंजूर टिपणी.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये, अनाधिकृत शाळांबाबत सन २०२६-२७ साठीची प्रेसनोट शासकिय नियमानुसार स्थानिक वर्तमान पत्रात व मिरा- भाईंदर मनपा संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावे.

सोबत:- प्रेसनोट प्रत जोडत आहे.

(सुलभा वटारे)
शिक्षणाधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईदर महानगरपालिका शिक्षण विभाग

## // प्रेसनोट //

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात शिक्षण विभागास प्राप्त झालेल्या शाळांच्या तक्रारीनुसार दि. ९/०७/२०२६ रोजी संबंधित शाळांचे केंद्र प्रमुख यांना शाळांचे सर्वेक्षण व तपासणी करुन लेखी अहवाल सादर करणेबाबत आदेश देण्यात आले होते. त्यानुसार दि. १०/०६/२०२६ रोजी प्राप्त लेखी अहवालनुसार विराज रॉयल स्कूल, मांडवी पाडा मिरारोड (पू.) व दारूल मदीना इंग्रजी शाळा मिरारोड पू. अनाधिकृत असलेबाबत कार्यालयास कळविले आहे. शासन निर्णयानुसार आवश्यक कागदपत्रांची तपासणी केली असता या शाळांनी शासन मान्यतेबाबतच्या कागदपत्रांची पूर्तता केली नसल्याचे निर्दशनास आले असून तरीदेखील त्या शाळा सुरु होत्या. सदरील शाळा या अनाधिकृत शाळा म्हणून घोषित करण्यात येत आहेत.

उपरोक्त शाळांबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात आली आहे. सर्व पालकांना यासाठी शिक्षण विभागातर्फे जाहीर आवाहन करण्यात येत आहे की, वरिल नमूद अनधिकृत शाळांमध्ये पालकांनी आपल्या पाल्यांचे प्रवेश घेऊ नये. सदर शाळांमध्ये प्रवेश घेतल्याने शैक्षणिक व आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असून पालकांनी सतर्क राहावे असे आवाहन शिक्षण विभाग मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी केले आहे.

(सुलभा वटारे)
**शिक्षणाधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**